# FIRST INFORMATION REPORT

(Under Section 173 B.N.S.S)
प्रथम खबर अहवाल
(कलम बी एन एस एस १७३ च्या अंतर्गत)

1. **District (जिल्हा):** अहमदनगर **P.S.(ठाणे):** आश्वी
   **FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0165 **Year (वर्ष):** 2024
   **Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):** 22/09/2024 07:16

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
   1. **Day(दिवस):** शनिवार
      **Date From (दिनांक पासून):** 21/09/2024
      **Time Period (कालावधी):**
      **Date To ( दिनांक पर्यंत):** 21/09/2024
      **Time From (वेळेपासून):** 11:18 बजे
      **Time To (वेळेपर्यंत):** 21:18 बजे

   (b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
   **Date (दिनांक ):** 22/09/2024 **Time (वेळ):** 06:58 बजे

   (c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
   **Entry No. (नोंद क्र.):** 009
   **Date & Time (दिनांक आणि वेळ):** 22/09/2024 06:58 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी
5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
   1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
   दक्षिण **Beat No. (बिट क्र.):**
   (b) **Address (पत्ता):** आश्वी पोलीस स्टेशन समोर ,संगमनेर

   (c) **In case, outside the limit of this Police Station, then (या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
   **Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
   **District(State) (जिल्हा(राज्य)):**

**6. Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** सुनिल तुकाराम बढे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 1985

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN) ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )**

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | निमगाव जाळी, तासंगमनेर,आश्वी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | निमगाव जाळी, तासंगमनेर,आश्वी,अहमदनगर,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):** 91-8956945799

**7. Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | रविंद्र भानुदास भाग्यवान | | | 1. श्रीव-हाडे यांचे घरात भाडयाने, बंक कॉलनी, लोणी, ताराहाता,, आश्वी,अहमदनगर,महाराष्ट्र, भारत |

**8. Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

**9. Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| 1 | नाणे आणि चलन | भारतीय- रुपया | 10,000/ रुपये लाचेची मागणी | 9,000.00 |

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|
| | | | करुन तडजोडीअंती 9,000 /रुपये | |

**10 Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रू. मध्ये)):**

9,000.00

**11.Inquest Report / U.D. case No., if any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

**12.First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**

फिर्याद दिनांक 22/09/2024

मी सुनिल तुकाराम बढे, वय 39 वर्षे, धंदा शेती, रा. निमगाव जाळी, ता.संगमनेर, जि.अहमदनगर. समक्ष फिर्याद देतो की, मी वरील पत्यावर एकत्रित कुटुंबात राहण्यास असुन मी दि.20/09/2024 रोजी पोलीस उप अधीक्षक श्री.त्रिपुटे, ला.प्र.वि.अहमदनगर यांना फोन करुन एका लोकसेवकाकडुन लाच मागणी होत असले बाबत तक्रार सांगितली. त्यानुसार त्यांनी मला दि.21/09/2024 रोजी 10/00 वा चे सुमारास निमगावजाळी, ता. संगमनेर येथे सुरक्षित ठिकाणी थांबण्यास सांगितले. त्यानुसार मी सुरक्षित ठिकाणी थांबुन होतो. सकाळी 10/15 वा. दरम्यान मी थांबलो त्या ठिकाणी पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे हे षासकीय वाहनाने तेथे आले. त्यांनी मला माझे नाव गाव विचारले तसेच त्यांची, त्यांच्या सोबतचे पथक व दोन पंच यांची ओळख सांगितली. त्यानंतर मी षासकिय वाहनात बसलो. त्यावेळी श्री. त्रिपुटे यांनी मला पंचासमक्ष माझी तक्रार विचारली असता मी लाचमागणीची तक्रार सांगितली की,मी वरील ठिकाणी एकत्रित कुंटुंबात राहण्यास आहे. दि.19/09/2024 रोजी आश्वी पोलीस स्टेषनचे पोलीस श्री. भाग्यवान दादा यांनी मला फोन करून तुमचे चुलत भाऊ बाळासाहेब बढे यांच्या विरूध्द आश्वी पोलीस स्टेषनला गुन्हा दाखल आहे. त्या संदर्भात तुमच्याषी चर्चा करायची आहे. त्यासाठी तुम्ही आश्वी पोलीस स्टेषनला येवुन मला भेटा असे सांगितले. त्याप्रमाणे मी आश्वी पोलीस स्टेषन येथे जावुन भाग्यवान पोलीस यांची भेट घेतली असता त्यांनी मला "तुझा चुलतभाऊ बाळासाहेब बढे याच्या विरूध्द आश्वी पोलीस स्टेषनला गुन्हा दाखल आहे. त्याला ताब्यात घेवुन तहसिल कार्यालय, संगमनेर येथे न्यावे लागेल. तहसिल कार्यालयात नेण्याची कारवाई टाळण्यासाठी व दाखल गुन्हयात आपसात तडजोड करण्यासाठी तुम्हाला मला 10,000/-रुपये दयावे लागतील. असे म्हणुन माझेकडे पैषांची मागणी केली व मला षनिवारी पोलीस स्टेषन येथे पैसे घेवुन ये असे सांगितले. भाग्यवान पोलीस यांची भेट घेवुन मी घरी आल्यानंतर माझा चुलतभाऊ बाळासाहेब बढे यास भेटुन भाग्यवान पोलीस यांनी त्याच्याविरूध्द दाखल गुन्हयात तहसिल कार्यालयात नेण्याची कारवाई टाळण्यासाठी व गुन्हयात आपसात तडजोड करण्यासाठी 10,000/-रुपयांची मागणी केली असल्याचे त्याला सांगितले. त्यावर माझ्या चुलत भावाने देखील भाग्यवान पोलीस यांस लाच देण्याची ईच्छा नसल्याचे मला सांगितले. तसेच चुलतभाऊ मला म्हणाला की,भाग्यवान पोलीसाने तुझ्याकडे लाचेची मागणी केली आहे तर तुच लाच मागणीबाबतची तक्रार दे, मी तुला पुर्णपणे संमती देतो. आम्हा दोघांचीही भाग्यवान पोलीस यांना लाच देण्याची ईच्छा नाही. मी आज दि. 21/09/2024 रोजी भाग्यवान पोलीस यांची आश्वी पोलीस स्टेशन येथे जावुन भेट घेणार आहे व त्यांच्याषी माझा चुलत भाऊ श्री. बाळासाहेब बढे याच्याविरूध्द दाखल गुन्हयाबाबत चर्चा करणार आहे. त्या दरम्यान त्यांनी माझ्याकडे लाचेची मागणी केल्यास त्याच्या विरुध्द कायदेषीर कारवाई करणे बाबतची तक्रार सांगितली व माझ्या स्वहस्ताक्षरात लिहुन दिली, त्यानंतर त्यावर मी, दोन्ही पंचांनी व श्री.त्रिपुटे यांनी स्वाक्षरी केली. त्यानंतर मी पोलीस भाग्यवान यांचे विरूध्द नोंदविलेल्या लाचमागणी तक्रारीची पडताळणी करण्याचे ठरले. पो.उपअधी. श्री. त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी कारवाईत व्हाईस रेकॉर्डरचा वापर करण्यात येणार असले बाबत कळवून त्याच्या वापराबाबत माहिती समजावून सांगितली. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे यांचे सुचनेप्रमाणे पोकॉ निमसे यांनी व्हाईस रेकॉर्डर मध्ये एक नवीन मेमरीकार्ड घालून, व्हाईस रेकॉर्डर चालू करुन, त्या मेमरीकार्डमध्ये काहीही रेकॉर्ड नसल्याची माझी व दोन्ही पंचाची खात्री करून दिली. त्यानंतर पोकॉ निमसे यांनी व्हॉईस रेकॉर्डर चालु करून त्यामध्ये पोलीस उप अधीक्षक श्री.

त्रिपुटे, दोन्ही पंच व मी निवेदन केले. त्यानंतर पो.उपअधी.श्री.त्रिपुटे यांनी लाचमागणी पडताळणी दरम्यान करावयाचे कारवाई बाबत मला व पंच नं.1 यांना सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकाँ निमसे यांनी व्हाँईस रेकाँर्डर चालु करून तो माझे ताब्यात दिला. पोलीस उप अधीक्षक श्री. त्रिपुटे यांनी पोलीस भाग्यवान यांच्या भेटीकरीता 11/18 वा. दरम्यान मला पंच नं 1 यांचेसह माझे दुचाकी वाहनाने रवाना केले. त्याप्रमाणे आम्ही रवाना झालो. मी व पंच नं. 1 असे आष्वी पोलीस स्टेषन येथे जावुन पोलीस भाग्यवान यांची भेट घेतली. मी त्यांच्याषी माझ्या चुलत भावावर दाखल गुन्हयाबाबत चर्चा केली असता त्या दरम्यान भाग्यवान पोलीस यांनी माझ्याकडे पंचासमक्ष 10,000/-रुपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती 9,000/-रुपये लाच मागणी करुन ती स्वीकारण्याचे मान्य केले. त्यानंतर मी व पंच क्र.1 असे माझ्या दुचाकी वाहनाने सापळा पथक थांबले त्या ठिकाणी 12/11 वा. दरम्यान परत आलो. त्यावेळी पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंच क्र. 1 व मला घडलेल्या हकीकतीबाबत विचारली असता पंच क्र. 1 यांनी व मी वरीलप्रमाणे हकीकत सांगितली. त्यानंतर पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी पंचासमक्ष व्हाँईस रेकाँर्डींग मध्ये रेकाँर्ड झालेले संभाशण ऐकले असता पोलीस भाग्यवान यांनी माझा चुलतभाऊ बाळासाहेब बढे याच्या विरूध्द आष्वी पोलीस स्टेषनला दाखल असलेल्या गुन्हयात त्याला तहसिल कार्यालयात नेण्याची कारवाई टाळण्यासाठी व दाखल गुन्हयात आपसात तडजोड करण्यासाठी माझ्याकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 9,000/-रुपये लाच मागणी करुन ती लाच रक्कम स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निश्पन्न झाले.

त्यानंतर पोकाँ निमसे यांनी व्हाँईस रेकाँर्डरमध्ये नवीन मेमरी कार्ड टाकले. त्यानंतर भाग्यवान पोलीस हे आष्वी पोलीस स्टेषनला आहेत अगर कसे याबाबत खात्री करण्यासाठी मी माझे मोबाईलवरुन त्यांना फोन केला असता त्यांनी नाही मी आता मयतीला आलो आहे असे सांगितले. मी त्यांना फोन करताल का असे विचारले असता त्यांनी चालेल असे सांगितले. सदरचा फोन काँल व्हाँईस रेकाँर्डरमध्ये रेकाँर्ड करण्यात आला. लोकसेवक भाग्यवान यांचा कधीही फोन येवु षकतो त्यामुळे त्यांचेविरूध्दच्या लाचेच्या सापळा कारवाईची पुर्वतयारी करण्याचे ठरले. लाच रक्कम म्हणुन देण्यासाठी मी माझ्या बचतीतुन 9,000/-रुपये त्यात 500/- रुपये दराच्या 18 भारतीय चलनी नोटा हजर केल्या. पोउपअधी.श्री.त्रिपुटे यांनी सदर सापळा कारवाईमध्ये अँन्थ्रासिन पावडर व अल्ट्राव्हायलेट दिव्याचा वापर करण्यात येणार असल्याचे सांगुन त्याबाबतचे प्रात्यक्षिक करून दाखविण्यात आले. मी हजर केलेल्या नोटांचे नंबर लिहुन घेण्यात आले. त्यानंतर नोटांना अँन्थ्रासिन पावडर लावण्यात आली व सदर लाच रक्कम माझ्या ताब्यात दिली. पो.उपअधी.श्री. त्रिपुटे यांनी सापळा कारवाईबाबत मला व सापळा पथकास आवष्यक त्या सुचना दिल्या व लाच स्वीकारल्यानंतरचा नियोजीत इषारा ठरवुन दिला.

बराच वेळ झाला तरी भाग्यवान पोलीस यांचा फोन न आल्यामुळे तसेच लाचमागणी कारवाई वेळी त्यांनी मला फोन करा किंवा संध्याकाळी या असे सांगितलेले असल्याने व आता त्यांच्या डयुटीची वेळ झाली असल्याने मी माझे मोबाईलवरून त्यांना फोन केला. त्यांनी मला ते पोलीस स्टेषनला असुन त्यांना ठाणे अंमलदार डयुटी आहे असे सांगितले. मी त्यांना येवु का मग असे विचारले असता त्यांनी अध्र्या एक तासाने या असे सांगितले. सदरचा फोन व्हाँईस रेकाँर्डरमध्ये रेकाँर्ड करण्यात आला. भाग्यवान पोलीस यांचेविरूध्द आष्वी पोलीस स्टेषन येथे सापळा लावण्याचे ठरले.

श्री. त्रिपुटे यांनी सर्वांना पुन्हा एकदा सुचना समजावुन सांगितल्या. त्यानंतर पोकाँ निमसे यांनी व्हाँईस रेकाँर्डर चालु करुन माझ्या ताब्यात दिला व पंच क्र. 1 सह मला माझे दुचाकी वाहनाने भाग्यवान पोलीस यांनी मागणी केलेली लाच रक्कम त्यांना देण्यासाठी आष्वी पोलीस स्टेशन येथे जाण्याकरीता 20/52 वा. दरम्यान रवाना करण्यात आले.

आम्ही आष्वी पोलीस स्टेषन येथे पोहचल्यानंतर थोडया वेळातच आमचे पाठोपाठ पो.उपअधी.श्री. त्रिपुटे, पंच नं. 2 व सापळा पथक असे षासकिय वाहनाने येवुन षासकिय वाहन पोलीस स्टेषनचे बाहेर काही अंतरावर उभे करून पायी चालत आले व कोणालाही षंका येणार नाही याप्रमाणे सापळा लावुन थांबुन राहीले. त्यानंतर मी व पंच क्र. 1 असे पोलीस स्टेषन समोर गेलो. आम्हाला पाहिल्यानंतर भाग्यवान पोलीस यांनी थांबा म्हणुन ईषारा केला. त्यानंतर भाग्यवान पोलीस आम्ही थांबलो त्या ठिकाणी आले. माझेत व त्यांचेत माझ्या चुलत भावावर दाखल असलेल्या गुन्हयाबाबत चर्चा झाली. त्यानंतर मी त्यांना ''तुम्ही सांगितल्याप्रमाणे 9,000/-रुपये आणलेत मोजुन घ्या असे म्हणुन मी 9,000/-रुपये लाच रक्कम त्यांचे समोर धरली असता त्यांनी मी पैसे मोजत नसतो, भरोसा आहे असे म्हणुन सदर लाचेची रक्कम त्यांचे उजव्या हाताने स्विकारून त्यांचे अंगातील पँन्टच्या समोरील उजव्या बाजुच्या खिषात ठेवली. त्यावेळी मी सापळा पथकास लाच स्वीकारल्याबाबतचा नियोजीत इषारा केला. त्यावेळी आजुबाजुला उभे असलेले सापळा पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी लोकसेवक भाग्यवान यांना लाच रकमेसह 21/18 वा. सुमारास रंगेहाथ पकडले. त्यावेळी पो.उपअधीक्षक श्री. त्रिपुटे यांनी त्यांना त्यांचे नाव व पत्ता विचारला असता

त्यांनी त्यांचे नाव रविंद्र भानुदास भाग्यवान, वय 52 वर्षे, धंदा नोकरी, सहायक फौजदार, नेमणुक आश्वी पोलीस स्टेषन, सध्या रा. श्री.व-हाडे यांचे घरात भाडयाने, बँक कॉलनी, लोणी, ता.राहाता, जि.अहमदनगर असे सांगीतले. त्यानंतर पो.उपअधी.श्री त्रिपुटे यांनी भाग्यवान पोलीस यांचे ताब्यातुन सदरची लाचेची रक्कम पंच क्र.2 च्या मदतीने ताब्यात घेतली. त्यावेळी पोलीस स्टेषन येथील एका कक्षात भाग्यवान पोलीस यांच्या तपासण्या करण्यात आल्या. त्यानंतर पुढील कामकाज करण्यासाठी षासकिय विश्रामगृह, संगमनेर येथे जाण्याचे ठरले. श्री.त्रिपुटे यांनी मला षासकिय वाहनाच्या पाठोपाठ षासकिय विश्रामगृह संगमनेर येथे येण्याचे सांगितले. श्री.त्रिपुटे हे भाग्यवान पोलीस यांना षासकिय वाहनात घेवुन षासकिय विश्रामगृह, संगमनेर येथे गेले. त्यांचेपाठोपाठ मी षासकिय विश्रामगृह येथे गेलो. त्यानंतर त्याठिकाणी पंचनाम्याचे पुढील कामकाज करण्यात आले.

तरी दि. 21/09/2024 रोजी लाचमागणी पडताळणी कारवाईच्या वेळी 11/18 वा. ते 12/11 वा. च्या दरम्यान व यषस्वी सापळा कारवाईवेळी 20/52 ते 21/18 वा. दरम्यान यातील लोकसेवक रविंद्र भानुदास भाग्यवान, वय 52 वर्षे, धंदा नोकरी, सहायक फौजदार, नेमणुक आश्वी पोलीस स्टेषन, सध्या रा. श्री.व-हाडे यांचे घरात भाडयाने, बँक कॉलनी, लोणी, ता.राहाता, जि.अहमदनगर यांनी माझा चुलतभाऊ बाळासाहेब बढे याच्या विरूध्द आश्वी पोलीस स्टेषनला दाखल असलेल्या गुन्हयात त्याला तहसिल कार्यालयात नेण्याची कारवाई टाळण्यासाठी व दाखल गुन्हयात आपसात तडजोड करण्यासाठी माझ्याकडे 10,000/- रुपये लाचेची मागणी करुन तडजोडीअंती 9,000/-रुपये लाच मागणी करुन ती लाच रक्कम माझ्याकडुन पंचासमक्ष स्वीकारली म्हणुन माझी त्यांचे विरुध्द फिर्याद आहे.

13. **Action taken: Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2. (केलेली कारवाईः बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)**

(1) **Registered the case and took up the investigation: (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):**

Sanjay Jayram Sonawane(I (Inspector)) / POBN74449 **or (किंवा)**

(2) **Directed (Name of I.O.) (तपास अधिका-याचे नाव):**

**Rank (पद):** **No.(क्र.):**

**to take up the Investigation (ला तपास करण्याचे अधिकार दिले) or (किंवा)**

(3) **Refused investigation due to (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):**

**or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)**

(4) **Transferred to P.S. (गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):**

**District (जिल्हा):**

**on point of jurisdiction (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .**

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost. (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.)**

**R.O.A.C.(आर. ओ .ए .सी.)**

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
**(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):**

15. **Date and time of dispatch to the court**
**(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):**

**Signature of Officer in charge, Police Station**
**(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)**

**Name (नाव):** Sanjay Jayram Sona
**Rank(पद):** I (Inspector)
**No.(सं.):** POBN74449

PSI
ठाणे अमलदार
आश्वी पोलीस ठाणे
ता.संगमनेर,जि.अहमदनगर